सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

आज़ादी का अमृत महोत्सव

G20 भारत 2023 INDIA







# पहिले वर्ष सुराज्याचे!

# पहिले वर्ष सुराज्याचे!

mahasamvad.in | /MahaDGIPR | /MaharashtraDGIPR

प्रकाशक : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन आणि मुख्यमंत्री जनसंपर्क कक्ष



शिवनेरी किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आदी मान्यवर.



पंचामृतावर आधारित २०२३-२४ चा अर्थसंकल्प सादर करण्याअगोदर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री देवेंद्र फडणवीस, शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर.

युती सरकार सत्तेवर येऊन वर्ष झाले आहे.
सर्वसामान्यांना केंद्रबिंदू
मानून राज्यात युतीचे सरकार विविध निर्णय
घेत आहे. एकीकडे शेतकरी, कष्टकरी,
महिला, तसेच वंचित घटकांचे कल्याण
हे उद्दिष्ट आहे, तर दुसरीकडे राज्यात
दर्जेदार पायाभूत सुविधा व्हाव्यात, मोठ्या
प्रमाणावर गुंतवणूक व्हावी, रोजगारासाठी
कौशल्य विकास अशा बाबींवर भर देऊन
राज्याला देशात आघाडी मिळवून देण्यासाठी
प्रयत्न सुरू आहेत. विशेष म्हणजे
मा. प्रधानमंत्र्यांचे मार्गदर्शन आम्हाला
असून यामुळे राज्याची एक ट्रिलियन डॉलर्स
अर्थव्यवस्थेकडे वाटचाल शक्य होणार आहे.



**श्री. एकनाथ शिंदे**
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



**श्री. देवेंद्र फडणवीस**
उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य







नागपूर–शिर्डी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गाचा पाहणी दौरा करताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस.

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| मदत व पुनर्वसन | ९ |
| नगर विकास | १० |
| सामान्य प्रशासन | १३ |
| सार्वजनिक बांधकाम | १४ |
| परिवहन | १५ |
| पणन | १६ |
| गृहनिर्माण | १७ |
| मृद् व जलसंधारण | १८ |
| माहिती तंत्रज्ञान | १८ |
| सामाजिक न्याय व विशेष साहाय्य | १९ |
| वित्त | २१ |
| सहकार | २२ |
| वस्त्रोद्योग | २२ |
| ग्रामविकास | २३ |
| ऊर्जा | २५ |
| गृह | २६ |
| जलसंपदा | २७ |
| कृषी | २८ |
| वने | ३० |
| वैद्यकीय शिक्षण | ३१ |
| विधि व न्याय | ३३ |
| उच्च व तंत्रशिक्षण | ३४ |

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| इतर मागास बहुजन कल्याण | ३५ |
| सार्वजनिक आरोग्य | ३६ |
| सांस्कृतिक कार्य | ३७ |
| पशुसंवर्धन आणि दुग्धविकास | ३८ |
| मत्स्यव्यवसाय | ३९ |
| कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता | ४० |
| कामगार | ४० |
| उद्योग | ४१ |
| बंदरे विकास | ४३ |
| शालेय शिक्षण | ४३ |
| पर्यटन | ४५ |
| अन्न व नागरी पुरवठा | ४६ |
| पाणीपुरवठा व स्वच्छता | ४६ |
| अल्पसंख्याक विकास | ४७ |
| महसूल | ४७ |
| महिला व बालविकास | ४९ |
| आदिवासी विकास | ५१ |
| क्रीडा | ५१ |
| पर्यावरण | ५२ |
| खनिकर्म | ५२ |
| मराठी भाषा | ५३ |
| शासन आपल्या दारी ! | ५४–५८ |

## मदत व पुनर्वसन

- सततचा पाऊस ही राज्य शासनामार्फत नैसर्गिक आपत्ती घोषित. शेती पंपांच्या नुकसानीसाठी १,५०० कोटी रुपये वाटप करणार.
- जून ते मार्च २०२३ मध्ये अतिवृष्टी, अवेळी पाऊस, सततच्या पाऊस यासाठी शेतीच्या नुकसानभरपाईकरिता ५९ लाख ५३ हजार २११ शेतकऱ्यांना ७,६६५ कोटी रुपये निधीचे वितरण.
- राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणतर्फे आपदा मित्र प्रशिक्षण कार्यक्रम, २० पूरप्रवण जिल्ह्यांमध्ये ७,९०० व्यक्तींना प्रशिक्षण दिले.
- उष्णतेच्या लाटांसंदर्भात राष्ट्रीय कार्यशाळा संपन्न.
- महाराष्ट्र राज्य उष्णतेच्या लाटा कृती आराखडा २०२२-२३ तयार.
- आपत्कालीन कालावधीकरिता सचेत प्रणालीच्या माध्यमातून राज्यातील १० कोटी नागरिकांना सतर्कतेचा इशारा.
- अतिवृष्टी आणि पूरग्रस्तांना एनडीआरएफच्या मदतीच्या दुप्पट रक्कम, दोनऐवजी तीन हेक्टर मर्यादेत मदत.
- केंद्र सरकारकडून एनडीआरएफच्या निधी व निकषात सुधारणा.



## नगर विकास



- ‘एमटीएचएल’ला ‘अटलबिहारी वाजपेयी स्मृती शिवडी–नाव्हाशेवा अटल सेतू’ असे नाव.
- दीनदयाळ अंत्योदय योजना आता १४३ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये राबवणार.
- स्वच्छ महाराष्ट्र अभियान नागरी २.० सुरू. १२ हजार ४०९ कोटी ३१ लाख रुपये खर्च येणार.
- मुंबईत प्रधानमंत्र्यांच्या हस्ते १७,२०० कोटी रुपये खर्चाच्या सात सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांची पायाभरणी.
- केंद्र शासनाच्या २.० अमृत अभियानाची अंमलबजावणी. सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये २०२५–२६ पर्यंत अभियान राबविणार.
- बृहन्मुंबईमध्ये समूह पुनर्विकासास मोठे प्रोत्साहन. अधिमूल्य तसेच विकास अधिभारामध्ये ५० टक्के सवलतीचा निर्णय.
- आशियातील सर्वात मोठ्या समूह पुनर्विकास योजनेचा ठाण्यात शुभारंभ. पहिल्या टप्प्यात सुमारे १० हजार घरांची निर्मिती होणार.
- मुंबईच्या सुशोभीकरणाचे ११५० उपक्रम सुरू. १७२९ कोटी रुपये खर्च.
- मुंबईतल्या ४०० कि.मी. रस्त्यांच्या काँक्रिटीकरणास सुरुवात. ६१०० कोटी रुपये खर्च अपेक्षित.
- मुंबई कोस्टल रोडचे सुमारे ६२ टक्के काम पूर्ण. कोस्टल रोडला छत्रपती संभाजीराजे यांचे नाव देणार.
- मुख्यमंत्री स्वच्छ मुंबई व्हॉट्सअ‍ॅप हेल्पलाइनच्या माध्यमातून रस्ते स्वच्छ, कचरामुक्त करणार.
- नवी मुंबई एकात्मिक औद्योगिक क्षेत्रात आंतरराष्ट्रीय वैद्यकीय तसेच शैक्षणिक संस्थांना उद्योग क्षेत्र म्हणून परवानगी.



अत्याधुनिक शैक्षणिक व संशोधन सुविधा उपलब्ध होतील. या प्रकल्पात ६० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक व १ लाख रोजगाराची निर्मिती होणार.

- नगरपरिषदा व नगरपंचायतींचे अध्यक्ष थेट जनतेमधून निवडणूक.
- नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ डिसेंबर २०२४ पर्यंत सुरू होणार. लोकनेते दि.बा.पाटील नवी मुंबई विमानतळ नामकरण प्रस्तावास मान्यता.
- एमएमआरडीएला विविध प्रकल्पांसाठी ६० हजार कोटी रुपयांपर्यंतचे कर्ज उभारण्यास मान्यता.



- नागपूर मेट्रो रेलच्या पहिल्या टप्प्याचे प्रधानमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन आणि नागपूर मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्याची पायाभरणी.
- नागपूर मेट्रो रेल टप्पा–२ प्रकल्पास सुधारित मान्यता. ४३.८० कि.मी. अंतराची मेट्रो मार्गिका उभारणार.
- कुलाबा–वांद्रे–सीप्झ मेट्रो मार्ग–३ प्रकल्पाच्या ३३ हजार ४०५ कोटी ८२ लाख रुपये सुधारित खर्चास मान्यता.
- मुंबईत ३३७ कि.मी. मेट्रोचे जाळे पसरणार. ४६ कि.मी. मार्ग खुला. आणखी ५० कि.मी. या वर्षी खुला.
- मुंबईत २–ए आणि लाइन ७ या मेट्रो मार्गांचा प्रधानमंत्र्यांच्या हस्ते शुभारंभ.



- नागपूर मेट्रो रेल प्रकल्प टप्पा–१ला सुधारित ९,२७९ कोटी रुपयांच्या सुधारित खर्चास मान्यता.
- खडकवासला–स्वारगेट पुलगेट हडपसर–लोणी काळभोर या मार्गांवर मेट्रो रेल्वे प्रकल्प.
- पुणे रिंगरोडच्या भूसंपादनासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला २५० कोटी रुपये.
- स्वारगेट–कात्रज भुयारी मेट्रो मार्गाचा प्रकल्प आराखडा केंद्राला मान्यतेसाठी सादर.
- 'महारेल'तर्फे महाराष्ट्रात उभारण्यात आलेल्या ९ रेल्वे ओलांडणी उड्डाणपुलांचे लोकार्पण. ११ उड्डाणपूल आणि भुयारी मार्गांचे भूमिपूजन.



- हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्ग आता नागपूर–शिर्डी–भरवीरपर्यंत खुला. नागपूरपासून गडचिरोलीपर्यंत मार्ग वाढविणार.
- हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकाचे काम युद्धपातळीवर.
- मुंबईतील कोळीवाड्यांच्या विकासासाठी विशेष विकास नियंत्रण नियमावली.




- मुंबई ट्रान्स हार्बर लिंक प्रकल्पाचे काम ९५ टक्के पूर्ण. रायगड जिल्ह्यातील चिर्लेजवळील पेण, पोयनाड परिसरात ग्रोथ सेंटर निर्माण करणार.
- धारावी पुनर्विकासासाठी कंपनी निश्चित.
- नगर विकास विभागाच्या कामकाजासाठी व राज्य शहर नियोजन संस्थेकरिता सुविधांसाठी योजना.
- स्वयंचलित पार्किंगची उंची ४५ मीटरवरून १०० मिटर पर्यंत; त्याचबरोबर शैक्षणिक इमारतींची उंची ३० मिटर वरून ४५ मीटरपर्यंत वाढविणार.

## सामान्य प्रशासन

- मराठवाडा मुक्ती संग्रामाचे भव्य स्मारक छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे उभारणार. १०० कोटींच्या खर्चास मान्यता.
- औरंगाबादचे नाव छत्रपती संभाजीनगर आणि उस्मानाबाद शहराचे नाव धाराशिव करण्यास केंद्राची मान्यता.
- अहिल्यादेवी होळकर यांचे नाव अहमदनगर जिल्ह्याला देण्याची घोषणा
- नागरिकांची निवेदने, पत्रांवर तत्काळ कार्यवाहीसाठी मंत्रालयात सेन्ट्रल रजिस्ट्री सुरू. ई ऑफिसवर भर दिल्याने कामकाजास वेग.




- प्रत्येक जिल्ह्यातून किमान ७५ हजार लाभार्थ्यांना विविध योजनांचा थेट लाभ देणाऱ्या 'शासन आपल्या दारी' उपक्रमास प्रचंड प्रतिसाद. आतापर्यंत पाटण, रत्नागिरी, कन्नड, कुडाळ, कोल्हापूर, पालघर, नांदेड, जळगाव येथे आयोजन.
- देशात आणीबाणीच्या काळात बंदिवानांना पूर्वीप्रमाणेच मानधन.
- महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील १०० टक्के व कक्षेबाहेरील ५० टक्के पदांची भरती.
- महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील पदभरतीसाठी टीसीएस, आयबीपीएसमार्फत परीक्षा. ७५ हजार रिक्त पदे भरती सुरू.
- आदिवासी गावांमध्ये १७ संवर्गातील सरळसेवेची १०० टक्के पदे स्थानिक आदिवासींमधून भरणार.



- १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत 'राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवडा'. नागरिकांच्या अर्जांवर १०० टक्के निपटारा.
- वर्ग–३ मधील लिपिकांची सर्व रिक्त पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत.
- सिंधुदुर्ग जिल्ह्यातील चिपी विमानतळाला 'बॅरिस्टर नाथ पै विमानतळ' असे नाव देणार.

## सार्वजनिक बांधकाम

- वर्सोवा वांद्रे सागरी सेतूला स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे नाव.
- रस्ते, बंदरे, विमानतळ, रेल्वे, मेट्रो, वीज इत्यादी पायाभूत सुविधा विकास क्षेत्रांसाठी निधी उभारणे आणि प्रकल्प राबविण्यासाठी 'महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळा'ची स्थापना.
- राज्यातील रस्त्यांच्या विकासासाठी जुलै २०२२ ते मे २०२३ या कालावधीत २५,७८२ कोटी रुपयांच्या ९,०८८ कामांना मंजुरी.



- हायब्रीड ॲन्युईटी टप्पा-१ अंतर्गत एकूण ९,६५५ कि.मी. लांबीच्या रस्त्यांची सुधारणा सुरू. या योजनेंतर्गत २०२२-२३ या आर्थिक वर्षात ४,०५० कोटी रुपये निधी खर्च, २०२२-२३ या आर्थिक वर्षात जवळपास ३,७०० कि.मी. लांबीच्या रस्त्यांची सुधारणा पूर्ण.
- हायब्रीड ॲन्युईटी योजनेंतर्गत (टप्पा-२ मध्ये) एकूण ७,५४४ कि.मी लांबीच्या रस्त्यांची सुधारणा करणार.
- आशियाई विकास बँक अर्थसाहाय्य योजनेच्या पहिला टप्प्यामध्ये (भाग-१) १५० दशलक्ष अमेरिकन डॉलर किमतीची (१,७५० कोटी रुपये) ४५१ कि.मी. लांबीची १३ कामे (९ पॅकेज) प्रगतिपथावर.
- भिवंडी-कल्याण-शीळफाटा रस्त्याच्या सहा पदरी रुंदीकरण करण्याच्या (५६१ कोटी ८५ लाख रुपये) प्रकल्पास प्रशासकीय मान्यता.



- नक्षलग्रस्त चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील रस्ते व पुलांचे काम बांधकाम प्रकल्पांतर्गत मागील १ वर्षामध्ये १५३ कि.मी. लांबीचे रस्ते आणि ५७ पूलांचे बांधकाम पूर्ण, या योजनेंतर्गत २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये २७७ कोटी एवढा निधी खर्च.

- कोकणातील पर्यटनवृद्धीसह पर्यटकांच्या सुखकर प्रवासासाठी कोकणातील १७ रेल्वे स्थानकांना प्रमुख राष्ट्रीय/राज्य मार्गाशी जोडण्याच्या कामासाठी ६६.३५ कोटी किमतीची तरतूद.
- सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सर्व योजनांचे संनियंत्रण करण्यासाठी PMIS - Project Management Information system ही संगणकीय प्रणाली विकसित. याद्वारे सर्व योजनांचे आर्थिक व भौतिक प्रगती अहवालाची अद्ययावत माहिती (Real Time data) उपलब्ध करणार.
- राज्यातील खड्ड्यांचे तक्रार निवारण तत्काळ व्हावे, यासाठी खड्डे तक्रार निवारण प्रणाली विकसित (Pothole Complaint Redressal System) या ॲपद्वारे सर्व नागरिकांना खड्ड्यांसंबंधी तक्रारी नोंदविण्याची सुविधा, तक्रार प्राप्त झाल्यानंतर तत्काळ खड्डे दुरूस्ती कामे पूर्ण करण्यात येणार.



## परिवहन

- जालना ते जळगाव नवीन ब्रॉडगेज रेल्वे मार्गासाठी ३,५५२ कोटी रुपये खर्चास मान्यता.
- स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त ७५ वर्षे पूर्ण ज्येष्ठ नागरिकांना एसटी प्रवास मोफत. ११ कोटींपेक्षा जास्त नागरिकांना लाभ.
- महिलांना एसटी प्रवासात सरसकट ५० टक्के सूट. १३ कोटींपेक्षा जास्त महिलांना लाभ.
- मोटार वाहन विभागासाठी सुधारित आकृतिबंध.
- पुणे–नाशिक अतिजलद रेल्वे मार्गामुळे विकासाला गती.





- अहमदनगर–बीड–परळी वैजनाथ २६१ कि.मी. रेल्वे मार्गाचा पहिला टप्पा. नवीन आष्टी–अहमदनगर ६६ कि.मी. मार्गाचे उद्‌घाटन आणि डेमू सेवेचा प्रारंभ.
- ४०० 'वंदे भारत' ट्रेन सुरू करण्यात येत असून त्यापैकी १२० गाड्या लातूरच्या कारखान्यात तयार.
- ऐच्छिकरीत्या वाहनांचे स्क्रॅपिंग करणाऱ्यांना व्याज व दंड माफ. भंगार वाहनांचा प्रश्न सुटणारा.
- फलटण–पंढरपूर नवीन ब्रॉडगेज रेल्वेमार्गाकरिता राज्य शासनाचा आर्थिक सहभाग. ९२१ कोटी रुपयांचा ५० टक्के वाटा.

## पणन

- बाजार समितीच्या निवडणुकीत शेतकऱ्यांना त्यांचे नाव मतदार यादीत नसले तरी त्यांना निवडणूक लढवण्याचा अधिकार.
- राज्यस्तरीय मिलेट महोत्सव : आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष अंतर्गत मिलेट महोत्सवानिमित्त मिलेट खरेदीदार, विक्रेता संमेलन व खरेदी करार आणि राज्यस्तरीय प्रदर्शनाचे आयोजन.
- नुकसानग्रस्त कांदा उत्पादक शेतकऱ्यांना ३५० रुपये प्रति क्विंटल अनुदान वितरित.



## गृहनिर्माण

- बीडीडी चाळ पुनर्विकासातील झोपडीधारक, स्टॉलधारकांची पात्रता निश्चित.
- मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत गाळ्यांचे वाटप करण्याच्या कार्यपद्धतीमध्ये सुधारणा करण्याकरिता समिती.
- रखडलेल्या झोपडपट्टी पुनर्विकास योजनांना गती. विकासकांची सूची तयार.
- पात्र लाभार्थ्यांना पुनर्वसन सदनिकांचा ताबा मिळाल्यापासून सात वर्षांच्या कालावधीनंतर विकण्यास परवानगी. झोपडपट्टी पुनर्वसन अधिनियमात सुधारणा करण्यास मंत्रिमंडळाची मान्यता.
- सन २००० ते २०११ पर्यंतच्या पात्र झोपडीधारकांच्या सदनिकेची किंमत सरसकट २.५० लाख रुपये.
- झोपडीधारकांच्या पात्र / अपात्रतेसंदर्भात पारदर्शकता आणण्याच्यादृष्टीने झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गतचे परिशिष्ट–२ संकेतस्थळावर प्रसिद्ध.
- बी.डी.डी. चाळीतील पोलीस सेवा निवासस्थानातील पोलीस कर्मचारी/ त्यांचे वारसदार यांना १५ लाख रुपयांमध्ये मालकी हक्काने घरे.
- बी.डी.डी. चाळीतील गाळेधारकांना २५ हजार रुपये दरमहा भाडे देण्याचा निर्णय. संक्रमण शिबिरातील घर किंवा भाडे याबाबतचा विकल्प.
- मुंबई गिरणी कामगारांची पात्रता तपासून घरांचा ताबा वेळेत देण्यासंदर्भात संनियंत्रण ठेवण्यासाठी समिती.
- म्हाडाअंतर्गत पुनर्विकासासंबंधीची देकारपत्रे देण्याबाबतचा अधिकार आता म्हाडा प्राधिकरणास.








- म्हाडाअंतर्गत एकल इमारतीचा पुनर्विकास न करता एकापेक्षा जास्त इमारती/ संस्था/ अभिन्यास यांचा समावेश करून एकत्रित पुनर्विकासाचे प्रस्ताव विचारात घेण्याचे अधिकार आता म्हाडा प्राधिकरणास.
- मुंबई शहरातील धोकादायक उपकरप्राप्त इमारतींचे तसेच उपकरप्राप्त इमारतींचे रखडलेले/अर्धवट अवस्थेतील पुनर्विकास प्रकल्प मार्गी लावण्यासाठी म्हाडा अधिनियमात सुधारणा.
- मुंबई शहर बेटावरील जीर्ण व मोडकळीस आलेल्या धोकादायक उपकरप्राप्त इमारतींचा मालक अथवा प्रस्तावित सहकारी गृहनिर्माण संस्था यांनी विकास न केल्यास म्हाडा करणार सदर इमारतींचा पुनर्विकास.
- मालक/विकासकांनी अर्धवट अवस्थेत सोडलेले उपकरप्राप्त इमारतींचे पुनर्विकास प्रकल्प म्हाडातर्फे पूर्ण करण्याची तरतूद.

## मृद् व जलसंधारण



- देवळा, वैजापूर तालुक्यातील बंधाऱ्यांना मान्यता.
- पाच हजार गावात जलयुक्त शिवार अभियान २.० राबवण्यात येणार आहे. या माध्यमातून पाणलोट क्षेत्राच्या शाश्वत विकासाला चालना मिळेल.

## माहिती तंत्रज्ञान

- **महाराष्ट्र युनिफाइड सिटिझन डाटा फॉर डिजिटल डिलीव्हरी ऑफ सर्व्हिसेस :** राज्यातील नागरिकांच्या सर्व तपशीलांचा समावेश असलेले केंद्रीकृत डाटा हब तयार करण्यासाठी ही योजना तयार करण्यात आली आहे. यामुळे शासनाचे विविध विभाग आणि इतर शासकीय संस्थांमधील

नागरिकांचा डाटा एकत्रित करणे आणि प्रमाणित करणे शक्य होणार आहे. या प्रमाणित डेटाचा वापर शासनाच्या विविध योजनांना प्रभावीपणे व जलदगतीने राबवण्यासाठी करता येईल.



- **भारतनेट :** राज्यातील सर्व ग्रामपंचायती उच्च क्षमतेच्या फायबर नेटवर्कने जोडण्यात येत आहेत. या प्रकल्पांमुळे ग्रामीण भागांतील डिजिटल डिवाईडची तफावत कमी होऊन ग्रामीण भाग इंटरनेटच्या माध्यमातून जगासोबत जोडला जाईल.
- **शहरी महानेट :** शहरी महानेट प्रकल्पाच्या अंतर्गत सर्व शासकीय आणि निमशासकीय, सार्वजनिक क्षेत्र उपक्रम, इ. मिळून एकूण २५,००० पेक्षा जास्त शहरी कार्यालये जोडण्यात येणार आहेत. जे ई–गव्हर्नन्स सेवा वितरित करण्यात सक्षम असतील. सद्य:स्थितीत १,९०० पेक्षा जास्त शहरी कार्यालये जोडण्यात आली आहेत.

## सामाजिक न्याय व विशेष साहाय्य

- संजय गांधी, श्रावणबाळ योजनेतील निवृत्तिवेतनात भरीव वाढ.
- भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे इंदू मिल दादर मुंबई येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे ४५० फूट उंचीचे स्मारकाचे काम प्रगतिपथावर. या प्रकल्पासाठी ३८८.७१ कोटी रुपये इतका अधिकचा निधी उपलब्ध. एप्रिल २०२५ पर्यंत होणार काम पूर्ण.



- दीक्षाभूमी, नागपूर येथील विविध विकासकामे करण्यासाठी ७० कोटी रुपये इतका निधी मंजूर.

- रमाई आवास योजनेसाठी (ग्रामीण व शहरी) अर्थसंकल्पात १,८०० कोटी रूपये निधी देण्यात आला असून दीड लाख घरकुलांची बांधणी करण्यात येणार. यातील किमान २५ हजार घरे ही मातंग समाजासाठी असतील.
- सन २०२३–२४ मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती BANRF - 2021 करिता एम.फिल. व पीएच.डी.साठी विशेष बाब म्हणून ८६१ विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्ती.
- मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण योजनेंतर्गत इमारतींच्या पुनर्विकासाचे नव्याने धोरण.
- लाड समितीच्या शिफारसीचा लाभ सर्वच सफाई कामगारांना. नोकरी आणि घराचीही शाश्वती.



- राज्यातील तृतीयपंथीयांना शिक्षण, नोकरी व शासकीय योजनांमध्ये लिंग पर्याय उपलब्ध.
- अनुसूचित जातीच्या उदयोन्मुख उद्योजकाच्या संशोधनात्मक प्रकल्पासाठी अर्थसाहाय्य अंतर्गत थ्रस्ट एअर क्राफ्ट लिमिटेड कंपनीच्या स्वदेशी बनावटीच्या १९ आसनी विमान निर्मितीसाठी संशोधन करण्याकरिता त्यांना १२ कोटी १९ लाख रुपये अनुदान.
- राजर्षी शाहू महाराज परदेश शिष्यवृत्ती २०२२–२३ करिता एकूण ७५ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर. एकूण ३८ विद्यार्थ्यांची प्रतीक्षायादी निर्धारित.
- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेंतर्गत जून २०२२ पासून ९६१ कोटी रुपयांच्या विविध विकासकामांना मंजुरी.
- १५ डिसेंबर २०२२ रोजी सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागातून दिव्यांग कल्याण विभाग या स्वतंत्र विभागाची निर्मिती.

## वित्त

- सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांच्या क्लस्टरला प्रोत्साहन. पायाभूत सुविधांसाठी सिडबीशी करार.
- नवीन पेन्शन योजनेतील कर्मचाऱ्याचा मृत्यू झाल्यास कुटुंब निवृत्तिवेतन देण्याचा पर्याय.
- पेट्रोलच्या करात पाच रुपये प्रति लिटर आणि डिझेलच्या करात तीन रुपयांची कपात, यामुळे राज्यातील जनतेला सुमारे सहा हजार कोटी रुपयांच्या करातून दिलासा.




- व्यापाऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने वस्तू व सेवाकर कायदा लागू होण्यापूर्वी राज्यकर विभागातर्फे राबविण्यात आलेल्या विविध कायद्यांच्या संदर्भात महाराष्ट्र कर व्याज, शास्ती व विलंब शुल्क, यांच्या थकबाकीची तडजोड योजना २०२३ ही आकर्षक अभय योजना १ मे २०२३ ते ३१ ऑक्टोबर २०२३ या कालावधीसाठी जाहीर.
- हवाई वाहतुकीला प्रोत्साहन आणि आर्थिक विकासाला गती देण्याच्या उद्देशाने विमान चालन चक्की इंधनावरील (एटीएफ) मूल्यवर्धित करायचा दर २५ टक्क्यांवरून १८ टक्क्यांवर.
- मासिक २५ हजार रुपये वेतन असलेल्या महिलांना व्यवसाय कर भरावा लागणार नाही.
- विक्रीकर न्यायाधीकरणाच्या मुंबई, पुणे, नागपूर खंडपीठांना ३१ मार्च २०२४ पर्यंत मुदतवाढ.
- राज्यात केंद्राच्या धर्तीवर राज्य मालमत्ता पुनर्रचना कंपनी स्थापन कंपनीचे भागभांडवल ३११ कोटी रुपये.




- ई–बिल आणि ई–व्हाऊचर प्रकल्पाचे प्रोजेक्ट्स प्रणाली सुरू. ई–बिल, ई–पीपीओ, ई–जीपीओ हे प्रकल्प कार्यान्वित.

## सहकार



- महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत प्रोत्साहनपर लाभ. अल्पमुदतीच्या पीक कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजारापर्यंत प्रोत्साहनपर लाभ. आतापर्यंत जवळपास १४.६ लाख पात्र शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यावर ५ हजार १०८ कोटी रुपये वितरित.
- भूविकास बँकेचे कर्ज घेतलेल्या ३४ हजार ७८८ शेतकऱ्यांच्या ९६४.१५ कोटी रुपये इतक्या थकीत कर्जाची रक्कम माफ.
- केंद्र पुरस्कृत प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांचे संगणकीकरण करण्याचा निर्णय.
- राज्यातील सहकारी संस्थांच्या व्यवसाय वृद्धीसाठी राज्य शासनाने सहकारी संस्थांसाठी अटल अर्थसाहाय्य योजनेस २०२२-२३ व २०२३-२४ या वर्षासाठी मुदतवाढ.
- स्वयंपुनर्विकास करणाऱ्या सहकारी गृहनिर्माण संस्थांचे मानीव अभिहस्तांतरण करण्याचा निर्णय.
- राज्यातील नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थांना येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी जिल्हास्तरावर स्थापन करण्यात आलेल्या तक्रार निवारण समितीमध्ये संबंधित को-ऑपरेटिव्ह हौसिंग फेडरेशनच्या प्रतिनिधींचा समावेश.
- राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत ऊस तोडणी यंत्रांना अनुदान.

## वस्त्रोद्योग

- रेशीम उद्योगाच्या विकासासाठी राज्य रेशीम-समग्र २ ही एकात्मिक योजना राबवणार आहे.

- एकात्मिक आणि शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ जाहीर. तांत्रिक वस्त्रोद्योगाला चालना देण्यासाठी कापूस प्रक्रिया क्षमता ३० वरून ८० टक्क्यांपर्यंत वाढविण्याचे उद्दिष्ट. यातून २५ हजार कोटींची गुंतवणूक आकर्षित करणार आणि ५ लाखांपर्यंत रोजगार निर्मिती करणार. कापसाची प्रक्रियाक्षमता ३० वरून ८० टक्क्यांपर्यंत वाढविण्याचे उद्दिष्ट. राज्यात ६ तांत्रिक वस्त्रोद्योग पार्क स्थापन करण्याचे उद्दिष्ट. अतिविशाल प्रकल्पासाठी प्रोत्साहन म्हणून विशेष पॅकेज. पर्यावरणपूरक आणि शाश्वत उत्पादनासाठी हरित तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यावर भर. या अंतर्गत विविध पर्यावरणपूरक उपायांसाठी ५० टक्के भांडवली अनुदान दिले जाणार.
- रेशीम अंडीपुंज निर्मितीकरिता आवश्यक तुती रेशीमबीज कोशनचा खरेदी दर ६०० ते ६५० प्रति किलोवरून ९५० ते १ हजार प्रति किलो इतका करण्यास मान्यता.



## ग्रामविकास

- ग्रामपंचायत निवडणुकीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास एक वर्षाची मुदतवाढ.

## तीर्थक्षेत्र विकास



१. श्री संत सेवालाल महाराज, पोहरादेवी ता. मानोरा जि. वाशिम या तीर्थक्षेत्राच्या विकास आराखड्यातील विकास कामांना यापूर्वी १०० कोटी रुपये रकमेस मान्यता. त्यानंतर या आराखड्यास अतिरिक्त ६७.०९ कोटी रुपये रकमेस मान्यता. त्यानुसार या आराखड्यास एकूण १६७.०९ कोटी रुपये रकमेच्या विकासकामांना सुधारित प्रशासकीय मान्यता.

२. उमरी व पोहरादेवी या नवीन तीर्थक्षेत्र विकास आराखड्यास ३२६ कोटी रुपये रकमेला प्रशासकीय मान्यता.

- कामगारांची वर्गवारी व परिमंडळनिहाय ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे मूळ किमान वेतन दर १ एप्रिल २०२२ पासून पुनर्निधारित करण्यात आले असून २२ जून २०२२ रोजी शासन निर्णय निर्गमित.

## प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण)



२४ नोव्हेंबर २०२२ रोजी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मंत्री ग्रामविकास यांच्या हस्ते अमृत महाआवास अभियानाचा शुभारंभ. गत एक वर्षात राज्यात ग्रामीण गृहनिर्माण अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) मध्ये ३,१९,४४१ व राज्य आवास योजनांमध्ये ८१,१७५ अशी एकूण ४,००,६१६ घरे पूर्ण.

## मुख्यमंत्री ग्रामसडक योजना



प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यात मुख्यमंत्री ग्रामसडक योजेनची अंमलबजावणी. २०१५-१६ ते २०२२-२३ या कालावधीत ३०,९६४ कि.मी. लांबीच्या रस्त्यांची दर्जोन्नती करण्यासाठी मान्यता. त्यापैकी २३,२९० कि.मी. लांबीच्या रस्त्यांची प्रत्यक्षात दर्जोन्नती झाली आहे. सद्य:स्थितीत ७,४२६ कि.मी. लांबीच्या रस्त्याची कामे प्रगतिप्रथावर. या योजनेसाठी सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात सर्व स्रोत मिळून ३,६४३ कोटी इतकी अर्थसंकल्पीय तरतूद.

## राष्ट्रीय जीवनोन्नती अभियान

१. सन २०२२-२३ मध्ये २,३८,३६८ महिला स्वयंसाहाय्यता समुहांना ५.८०६ कोटी रुपयांचे बँक कर्ज उपलब्ध. ९९,००० महिला स्वयंसाहाय्यता १५० कोटी रुपयांचा फिरता निधी वितरित.

२. बँक कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या १,६१,१२४ महिला स्वयंसाहाय्यता समुहांना २२.३२ कोटी रुपयांचे व्याज अनुदान.

३. सन २०२२-२३ मध्ये वैयक्तिक उद्योग व्यवसायाकरिता १७,३७८ महिला स्वयंसाहाय्यता समुहातील सदस्यांना बँकेमार्फत कर्ज उपलब्ध.

## ऊर्जा



- विद्युत वितरण प्रणालीत मोठ्या प्रमाणावर सुधारणा.
- महावितरणच्या ३९ हजार ६०२ कोटी रुपये व बेस्टच्या ३ हजार ४६१ कोटी रुपये रवमेच्या सविस्तर प्रकल्प अहवालास मान्यता.
- शेतीला दिवसा वीज पुरवठ्यासाठी ३ वर्षात ३० टक्के वीजवाहिन्यांचे सौर ऊर्जीकरण. ९.५० लाख शेतकऱ्यांना लाभ. प्रलंबित ८६ हजार७३ कृषिपंप अर्जदारांना तत्काळ वीज जोडणी.
- कुसुम योजनेचा घटक व अंतर्गत १,००,००० प्रतिवर्ष सौर कृषी पंपाच्या उद्दिष्टांपैकी आजतागायत एकूण ६०, २४४ सौर कृषी पंप राज्यात महाऊर्जाद्वारे आस्थापित झाले आहेत. त्यामुळे ६०, २४४ शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा उपलब्ध.



- राज्यातील ६६ के. व्ही. व त्यापेक्षा अधिक क्षमतेच्या अति उच्चदाब पारेषण वाहिन्यांसाठी उभारण्यात येणाऱ्या मनोऱ्याने व्याप्त जागेचातसेच अति उच्चदाब पारेषण पट्टयाखालील वाहिनीच्या जमिनीचा नुकसान भरपाईपोटी मोबदला देण्यासंदर्भात सुधारित धोरण राबविण्यासाठी २ नोव्हेंबर २०२२ रोजीच्या शासन निर्णया अन्वये कार्यवाही सुरु.
- उदंचन जलविद्युत प्रकल्प विकसनासाठी नॅशनल हायड्रो पॉवर कॉर्पोरेशन लिमिटेड; तसेच टोरंट पॉवर लिमिटेड यांच्याशी अनुक्रमे ४४ हजार कोटी रुपये व २७ हजार कोटी रुपयांचे सामंजस्य करार.

## गृह



- राजकीय व सामाजिक आंदोलनांतील गुन्ह्यांमध्ये जून २०२२ पर्यंत दोषारोपपत्र दाखल असे खटले मागे घेणार.
- पोलीस शिपाई ते पोलीस निरीक्षक यांच्या नैमित्तिक रजा १२ पासून २० इतक्या वाढविण्याचा निर्णय.
- वडसा देसाईगंज–गडचिरोली या नवीन रेल्वे मार्गाला १ हजार ९६ कोटी इतक्या द्वितीय सुधारित खर्चास आणि राज्य शासनाच्या ५० टक्के आर्थिक सहभागास मान्यता. ५४८ कोटी राज्य शासनाच्या हिश्श्याचे.
- पोलीस भरतीची प्रक्रिया वेगाने सुरू.
- मुंबईमध्ये सीसीटीव्ही बसविण्याचा टप्पा १ पूर्ण. टप्पा–२ ची कार्यवाही सुरू.
- असुरक्षित सागरी तळावर सीसीटीव्ही व नवीन बोटी खरेदी करण्यासाठी कार्यवाही.



- राज्यात सायबर सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य. सल्लागाराची नियुक्ती.
- नवीन कारागृह निर्मिती करण्याबरोबरच कारागृह विभागात सुधारणा करणार.
- शिपाई रिक्त पदे १०० टक्के भरण्यासाठी पदभरती निर्बंधांतून सूट. २० हजार पोलीस शिपायांची पदे भरण्याचा मार्ग मोकळा.
- पोलीस दलातील अधिकारी आणि अंमलदारांना पूर्वीप्रमाणेच बँकांमार्फत घरबांधणीसाठी कर्ज.
- मुंबईत विशेष पोलीस आयुक्त हे पद निर्माण.

## जलसंपदा

- भामा आसखेड प्रकल्पाचे कालवे रद्द करणार. तीन तालुक्यातील शेतकऱ्यांना लाभ.
- पूर प्रतिबंधासाठी राज्यातील १,६४८ कि.मी.च्या नद्यांमधील गाळ काढणार.
- गंगापूर उपसा सिंचन योजनेस मान्यता.
- २९ जलसंपदा प्रकल्पांना सुधारित मान्यता. ६.५ लाख हेक्टर जमीन सिंचित होणार.
- बाभुळगाव (जि. यवतमाळ) येथील वर्धा बॅरेज उपसा सिंचन योजनेच्या ५६५ कोटी ८७ लाख रुपये किमतीच्या कामांना सुधारित प्रशासकीय मान्यता.
- कणकवली तालुक्यातील ओटाव लघु पाटबंधारे प्रकल्पास ९९.४९ कोटी रुपयांची सुधारित मान्यता.
- जव्हार (जि.पालघर) मधील मौजे हिरडपाडा येथील लेंडी लघु पाटबंधारे प्रकल्पासाठी १८७ कोटी ०४ लाख रुपयांच्या कामांना दुसरी सुधारित मान्यता.
- भंडारा जिल्ह्यातील सुरेवाडा उपसा सिंचन योजनेसाठी ३३६ कोटी २२ लाख रुपये सुधारित खर्चास मान्यता.
- बुलडाणा जिल्ह्यातील अरकचेरी आणि आलेवाडी बृहत् लघु पाटबंधारे प्रकल्पांना सुधारित मान्यता. सुमारे १,९१८ हेक्टर जमिनीला सिंचनाचा फायदा होईल.
- उर्ध्व गोदावरी प्रकल्प ता. जि. नाशिक, या प्रकल्पाच्या चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यता अहवालास १,४९८.६१ कोटी रुपये इतक्या किमतीस मान्यता प्रदान. या प्रकल्पाच्या पाणी वापरानुसार नाशिक, अहमदनगर व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ७४,२१० हे. सिंचनक्षेत्रास लाभ होणार.





- कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्प जि. उस्मानाबाद व बीड या प्रकल्पास ११,७२६.९१ कोटी रुपये किमतीस द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान. या प्रकल्पामुळे उस्मानाबाद व बीड जिल्ह्यातील एकूण ३३,९४५ हे. क्षेत्र सिंचनाखाली येणार.



- निरा देवघर प्रकल्प ता. भोर जि. पुणे प्रकल्पाला ३,९७६.८३ कोटी रुपये इतक्या किमतीची तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान. या प्रकल्पामुळे ४३,०५० हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ.

- पुरंदर उपसा सिंचन योजना जि. पुणे या प्रकल्पास ४६०.९५ कोटी रुपये किमतीस प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता. या प्रकल्पामुळे २५.४९८ हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ.

- प्रवरा (निळवंडे–२) प्रकल्प ता. अकोले, जि. अहमदनगर या प्रकल्पास ५,१७७.३८ कोटी किमतीस पाचवी सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान. या प्रकल्पामुळे ६८,८७८ सिंचन क्षेत्रास लाभ.

## कृषी

- नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचा दुसरा टप्पा, विदर्भातील जिल्ह्यांचा समावेश.

- बुलडाणा येथे शासकीय कृषी महाविद्यालय.

- चांदुर बाजार तालुक्यात लिंबूवर्गीय फळांसाठी सिट्रस इस्टेट.

- नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेत राज्यातर्फे प्रति शेतकरी ६ हजार रुपये. १.१५ कोटी शेतकरी कुटुंबांना लाभ.

- १ कोटीपेक्षा जास्त शेतकऱ्यांना प्रधानमंत्री कृषी सन्मान निधी योजनेचा लाभ.

- महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना आता केवळ १ रुपयांत पीकविमा. ३,३१२ कोटी रुपये सरकार भरणार.

- पीएम किसान योजनेची कार्यपद्धती सुधारण्याचा निर्णय.

- महाकृषी विकास अभियान. ५ वर्षांत ३,००० कोटी रुपये देणार.

- ‘मागेल त्याला शेततळे’ योजनेचा आता व्यापक विस्तार. १,००० कोटी रुपये खर्च करणार.
- काजू बोंडूवर प्रक्रिया केंद्र, काजू फळ विकास योजना. २०० कोटी रुपये गुंतवणुकीचे काजू बोर्ड.



- गोपीनाथ मुंडे शेतकरी सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना सरकारकडून, लाभही २ लाख रुपयांपर्यंत.
- डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशनला मुदतवाढ देण्याचा तसेच राज्यभर व्याप्ती वाढविण्याचा निर्णय. ३ वर्षांत २५ लाख हेक्टर क्षेत्र सेंद्रिय शेतीखाली आणणार. १,००० जैवनिविष्ठा स्रोत केंद्रे स्थापन करणार.
- आंतरराष्ट्रीय भरड धान्य वर्षानिमित्त ‘श्रीअन्न अभियान. २०० कोटी रुपयांची आर्थिक तरतूद.
- नागपुरात कृषी सुविधा केंद्र, विदर्भात संत्राप्रक्रिया केंद्र.
- एक लाख ३७ हजार ७९९ लाभार्थींना ८२४ कोटींहून अधिक अनुदान कृषी यांत्रिकीकरण योजनेच्या माध्यमातून.
- नागपुरात डॉ. पंजाबराव देशमुख कृषी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय कृषी सुविधा केंद्र करणार.
- हिंगोली जिल्ह्यात बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्र स्थापणार.



- सिल्लोड तालुक्यातील मौजे कोटनांद्रा व डोईफोडा येथे मका संशोधन केंद्र उभारणार.
- एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानात शेतकऱ्यांना १२ कोटी रुपयांहून अधिक अनुदान थेट खात्यावर.
- प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना-२ ही ३० जिल्ह्यांत. १४४ प्रकल्प मंजूर असून ५ लाख ६५ हजार १८६ हेक्टर क्षेत्राला सिंचन मिळणार. केंद्राने ५० कोटी ८ लाख रुपये यासाठी दिले असून राज्याने ३३ कोटी ३९ लाख रुपये निधी दिला आहे.
- २०० कोटी रुपयांच्या तरतुदीसह ‘महाराष्ट्र पौष्टिक तृणधान्य अभियान’ सुरू.

## वने

- राज्यात १२ संवर्धन राखीव क्षेत्र अधिसूचित. १८ संवर्धन राखीव क्षेत्रांची अधिसूचना जारी करण्याची कार्यवाही सुरू.
- वन उत्पादनांची वाहतूक करण्यासाठी संपूर्ण राज्यभर ई–वाहतूक प्रणाली.
- मानव–वन्यजीव संघर्ष प्रकरणात वाढीव अर्थसाहाय्य देण्याची तरतूद. व्यक्ती मृत झाल्यास २० लाख रुपये, कायम अपंग झाल्यास ५ लाख रुपये, गंभीर जखमी झाल्यास १ लाख २५ हजार रुपये आणि किरकोळ जखमी झाल्यास खासगी रुग्णालयात औषधोपचारासाठी २० हजार रुपये प्रति व्यक्ती.



- महाराष्ट्र बांबू विकास मंडळांतर्गत केंद्र शासनाच्या स्फूर्ती योजनेंतर्गत साकोली आणि वर्धा येथे दोन बांबू क्लस्टरची निर्मिती.
- कांदळवन व सागरी जैवविविधता अभ्यासक्रमासाठी एकूण २५ विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी परदेशी शिष्यवृत्ती मंजूर. तीन वर्षात एकूण ७५ विद्यार्थ्यांना लाभ मिळणार.



- स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त राज्यात बेलवन, अमृतवन आणि पंचायतन वन उद्यानांची निर्मिती. ७५ धार्मिक तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी बेलवन, महत्त्वाच्या शहरांमध्ये ७५ ठिकाणी अमृतवन आणि प्रत्येक जिल्ह्यातील २५ गावांमध्ये पंचायतन वन उद्यानांची निर्मिती करण्याचे काम प्रगतिपथावर.
- राष्ट्रीय हरित सेनेचे (इको क्लब) बळकटीकरण करण्याचा निर्णय.
- तेंदूपान संकलनातील संपूर्ण स्वामित्व शुल्क तेंदूपान संकलन मजुरांना प्रोत्साहनात्मक मजुरी म्हणून वाटप करण्याचा निर्णय.

## वैद्यकीय शिक्षण

- राज्यात ९ ठिकाणी नवीन शासकीय महाविद्यालये. ४,३६५ कोटी रुपये खर्चास मान्यता.
- प्रत्येक जिल्ह्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्याचे धोरण. त्यानुसार या शैक्षणिक वर्षापासून रत्नागिरी येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू. परभणी येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्याबाबतचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी सादर. नाशिक येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नसलेल्या ९ जिल्ह्यांत (पालघर, गडचिरोली, अमरावती, वाशिम, जालना, बुलडाणा, अंबरनाथ, भंडारा, आणि वर्धा) शासकीय वैद्यकीय महाविद्यालये लवकरच सुरू करण्यात येणार.



- राज्यातील शासकीय महाविद्यालयांचे श्रेणीवर्धन करणे व नव्याने प्रस्तावित शासकीय वैद्यकीय महाविद्यालये उभारण्याकरिता आशियाई विकास बँक संस्थेकडून सुमारे ४,००० कोटी व जपान इंटरनॅशनल को-ऑपरेशन एजन्सी या संस्थेकडून सुमारे ५,५०० कोटी रुपयांचे कर्ज घेणार.



- शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांमार्फत रक्तदान मोहीम, स्थूलपणा जनजागृती व उपचार अभियान, स्तन कर्करोग जनजागृती व उपचार अभियान, स्वच्छ मुख अभियान, थायरॉईड जनजागृती व उपचार अभियान आणि अवयव दान जनजागृती अभियाने सुरू करण्यात आली असून सातत्याने सुरू ठेवण्यात येणार आहेत.
- शासकीय वैद्यकीय महाविद्यालय तसेच रूग्णालयातील परिचर्या, तांत्रिक व अतांत्रिक संवर्गातील एकूण ५,१८२ पदे भरण्याबाबतची जाहिरात १० मे २०२३ रोजी प्रसिद्ध. ही भरती प्रक्रिया टी.सी.एस. या नामांकित कंपनीकडून ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात येत आहे.

- वैद्यकीय महाविद्यालयास जोडून वाढीव १५७ नर्सिंग महाविद्यालयांना मान्यता देण्याबाबत सन २०२३-२०२४ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात घोषणा. त्याच धर्तीवर राज्यातील सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना जोडून बीएससी नर्सिंग अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहे.
- जळगाव येथे मेडिकल हब निर्माण करण्यात आले असून त्यानुसार शासकीय वैद्यकीय, दंत, आयुर्वेद, होमिओपॅथी व भौतिकोपचार महाविद्यालये उभारण्यात येणार आहेत. त्यानुसार तेथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय सुरू झाले आहे, तर राज्यातील पहिले शासकीय होमिओपॅथी महाविद्यालय जळगाव येथे सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षापासून सुरू.
- भारतीय वैद्यकीय आयोगाच्या मानकांनुसार शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये आवश्यक निवासी वैद्यकीय अधिकारी यांची १,४३२ पदे निर्माण करण्यात आली.



## विधि व न्याय

- मुखेड, उमरखेड, चिखलदरा, महाड, हरसूल, वरूड, फलटण येथे न्यायालये.
- १३८ विशेष जलदगती न्यायालयांकरिता ४१४ नियमित पदे निर्माण करणार.
- माणगाव रामटेक, इगतपुरी, बेलापूर, कर्जत, बाई, येवला, परांडा, सिन्नर, औसा येथे विविध जिल्हा तसेच दिव न्यायालये स्थापन करून पदनिर्मिती करण्याचा निर्णय.
- न्यायालयीन इमारतीच्या बांधकामांना ८२८ कोटी रुपये इतका निधी. न्यायाधीश निवासस्थानांच्या बांधकामांना २५० कोटी रुपये इतका निधी.
- दुय्यम न्यायालयातील न्यायिक अधिकाऱ्यांना दुसऱ्या राष्ट्रीय वेतन आयोगाच्या शिफारसीनुसार सुधारित वेतन.
- मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशास अनुसरून Negotiable Instrument Act, १८८१च्या कलम १३८ अंतर्गत दाखल प्रकरणे चालवण्यासाठी नागपूर, नाशिक, पुणे, ठाणे व मुंबई या ५ ठिकाणी प्रत्येकी १ याप्रमाणे एकूण ५ विशेष न्यायालये स्थापन करण्यास मान्यता.
- बेलापूर, नवी मुंबई, जिल्हा ठाणे येथे एक कौटुंबिक न्यायालय स्थापन करण्यास व त्यासाठी पदनिर्मिती करण्यास मान्यता.
- National Mission for Safety of Women अंतर्गत महिलांवरील बलात्काराची व POCSO कायद्यांतर्गत बालकांवरील अत्याचाराची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी प्रत्येक विशेष जलदगती न्यायालयासाठी न्यायाधीशांच्या पदासह साहाय्यभूत कर्मचाऱ्यांची एकूण ३ नियमित पदे निर्माण करण्यास व एकूण ६९० मनुष्यबळाच्या मर्यादेत बाह्ययंत्रणेकडून सेवा घेण्यास मंजुरी.
- अमरावती येथे एक अतिरिक्त कौटुंबिक न्यायालय स्थापन करण्यास व त्यासाठी पदनिर्मिती करण्यास मान्यता.
- न्यायालयीन इमारती व न्यायाधीश निवासस्थाने यांच्या बांधकामाकरिता निधी वितरित.



## उच्च व तंत्रशिक्षण

- राज्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये अद्ययावत उत्कृष्टता केंद्र.
- सर जे जे कला आणि वास्तुशास्त्र महाविद्यालय आता अभिमत विद्यापीठ.
- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमलबजावणी सुरू. राज्यातील १३ अकृषी विद्यापीठांच्या पदवीत्तर विभागात, ९० स्वायत्त महाविद्यालयात आणि विद्यापीठ सलंग्न महाविद्यालयात पदवीत्तर अभ्यासक्रम असलेल्या १,२९५ महाविद्यालयात नवीन शैक्षणिक धोरण अंमलबजावणी सुरू.
- मुंबईत भारतरत्न लता दीनानाथ मंगेशकर आंतरराष्ट्रीय संगीत महाविद्यालय सुरू.



- तासिका तत्त्वावरील अध्यापकांच्या मानधनात वाढ. सहायक प्राध्यापक, प्राचार्य, शारिरीक शिक्षण संचालक, ग्रंथपाल ही पद भरण्यास मान्यता.
- राज्यातील नामांकित शिक्षण संस्थांना विशेष अनुदान देण्यासाठी सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात ५०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध.
- कोल्हापूर येथे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू.
- नागपूर येथील महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठातील सुविधांसाठी २५ कोटी ८५ लाख रुपयांचा निधी मंजूर.
- अभिमत विद्यापीठातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क शिष्यवृत्तीची योजना लागू .
- चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर येथे एसएनडीटी विद्यापीठाचे केंद्र सुरू करण्यास मान्यता.



- युनिसेफ, उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग यांच्यात जलसंधारण आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीबाबत करार.
- शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयाच्या अनुदानात ६० टक्के वाढ.
- राज्यातील विद्यापीठे व उच्च शिक्षण संस्थांमध्ये गुणात्मक बदल करण्यासाठी परीसस्पर्श योजना.
- कला संस्थांमधील शिक्षक, कर्मचाऱ्यांना विविध सेवाविषयक लाभ.

- पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्रांसाठी राज्य सरकारने तीन कोटी रुपयांचा निधी मंजूर.
- शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर भुयारी मार्गासाठी ८ कोटी ४८ लाखाचा निधी मंजूर.

## इतर मागास बहुजन कल्याण



- राज्यातील इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागासवर्ग या प्रवर्गातील मॅट्रिकोत्तर व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी १ हजार विद्यार्थी क्षमतेचे मुलांसाठी एक व मुलींसाठी एक याप्रमाणे ३६ जिल्ह्यांच्या ठिकाणी ७२ शासकीय वसतिगृहे सुरू करण्याचा निर्णय.
- निपुण भारत योजनेच्या धर्तीवर विजाभज प्रवर्गाच्या आश्रम शाळांमधील विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्यासाठी या योजनेची अंमलबजावणी.
- यशवंतराव चव्हाणमुक्त वसाहत घरकुल योजनेसाठी या अर्थसंकल्पात १८० कोटींची भरीव वाढ.
- वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजनासाठी या अर्थसंकल्पात ३८० कोटींची भरीव वाढ.
- इतर मागासवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांसाठी परदेशातील उच्च शिक्षणाच्या शिष्यवृत्ती विद्यार्थी संख्या १० वरून ५० इतकी वाढ.
- मराठा आरक्षणाबाबत उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती गठित.
- वसंतराव नाईक विमुक्त जाती भटक्या जमाती विकास महामंडळाचे भागभांडवल २०० कोटींवरून ५०० कोटी व महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाचे भाग भांडवल २५० कोटींवरून २,००० कोटी वाढविण्याची घोषणा.

## सार्वजनिक आरोग्य



- महाराष्ट्रात ७०० हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना आणि पॉलिक्लिनिकची केंद्रे सुरू करणार. त्यातील मुंबईत १६३ आरोग्य केंद्रे कार्यरत. २१० कोटीस मान्यता.
- महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत प्रधानमंत्री आरोग्य योजना एकत्रित. २ कोटी कार्ड्स वाटणार. आता ५ लाखांपर्यंत आरोग्य संरक्षण.
- मुख्यमंत्री वैद्यकीय साहाय्यता कक्षामार्फत गेल्या वर्षभरात सुमारे ८३ कोटी रुपयांपेक्षा जास्त मदत.
- महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजनेत विमा संरक्षण १.५० लाखांहून ५ लाख रुपये. २०० रुग्णालयांचा समावेश.
- महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत, प्रधानमंत्री जन आरोग्य योजना या एकत्रित योजनेंतर्गत ४ जानेवारी २०२३ पर्यंत २२ लाख मोफत शस्त्रक्रिया आणि उपचाराचा लाभ.
- सीमा भागात ८६५ गावांत मराठी भाषिकांना महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना लागू.
- 'आयुष्यमान भारत' पंधरवड्यात ६०० पेक्षा जास्त आरोग्य शिबिरे. लाभार्थींना आयुष्यमान कार्ड वितरित करण्यासाठी विशेष मोहीम.
- 'माता सुरक्षित तर घर सुरक्षित' या विशेष मोहिमेत महिलांना तपासणीसाठी नेण्याकरिता; तसेच औषधांसाठी प्रति जिल्हा २ कोटी रुपये निधी. ४ कोटी महिलांची आरोग्य तपासणी.
- आशा स्वयंसेविकाच्या मानधनात भरीव वाढ.
- राज्यभरात ० ते १८ वर्षांपर्यंतची बालके, किशोरवयीन मुलामुलींच्या सर्वांगीण आरोग्य तपासणीसाठी जागरूक पालक–सदृढ बालक अभियान.
- मेळघाटसाठी ४४ कलमी कार्यक्रमांची अंमलबजावणी.
- औषध खरेदी प्राधिकरणाची स्थापना.
- 'आरोग्याची वारी पंढरीच्या दारी' या उपक्रमातून वारकऱ्यांची आरोग्य तपासणी.

## सांस्कृतिक कार्य



- 'जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा' गीताला महाराष्ट्र राज्यगीताचा दर्जा.
- स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवांतर्गत ३०० कोटी रुपयांच्या कामांना मंजुरी.
- दादासाहेब फाळके चित्रनगरी, कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ येथील पायाभूत सुविधा, पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी यांचे नुतनीकरण, राजभवन येथील बंकर येथे थोर क्रांतिकारकांच्या जीवनावर थ्री-डी होलोग्राफिक चित्रपट तयार करणार.
- रायगड येथे शिवराज्याभिषेक दिनाचा ३५० वा वर्षसोहळा; विशेष टपाल तिकीट प्रकाशित. वर्षभर विविध कार्यक्रमांचे आयोजन.
- राज्यातील गडकिल्ल्यांचे जतन आणि संवर्धनासाठी गडसंवर्धन समिती स्थापन.
- राज्यातील २० हजार प्राचीन बारवांचे ऐतिहासिक आणि सामाजिक महत्त्व लक्षात घेऊन बारव पुनरुज्जीवन आणि जतनासाठी बारव संवर्धन समिती गठित.
- महाराष्ट्र शाहीर पद्मश्री कृष्णराव साबळे जन्मशताब्दी वर्षानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन.



- नदी संरक्षण आणि संवर्धनासाठी 'चला जाणू या नदीला' अभियान. उपक्रमांतर्गत वर्षभर विविध कार्यक्रम.
- स्वराज्य महोत्सवांतर्गत राज्यातील विविध कार्यक्रमांचे आयोजन.
- राज्य संरक्षित स्मारकांच्या जतन संवर्धनाचे काम हाती घेण्यात आले. १२० कोटी रुपयांच्या निधीस प्रशासकीय मान्यता.

## पशुसंवर्धन आणि दुग्धविकास



- राज्यात दीड कोटी पशुधनाचे कमी कालावधीत विक्रमी मोफत लसीकरण व उपचार. लम्पी चर्मरोगामुळे मृत ३५ हजारांहून अधिक पशुधनासाठी सुमारे ८९ कोटी रुपयांचे अर्थसाहाय्य. १०० टक्के लसीकरण व सर्वाधिक मदत.
- पशुधनाच्या लसीच्या निर्मितीत स्वयंपूर्ण होण्यासाठी पुण्यात ७० कोटी रुपये खर्चून प्रयोगशाळा उभारण्यात आली. सप्टेंबर २०२३ पासून प्रत्यक्ष लसीच्या उत्पादनाला सुरुवात होणार. 'लम्पी' लस निर्मिती करणारे महाराष्ट्र पहिले राज्य ठरणार.
- नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालयाची अहमदनगर येथे स्थापना करण्यासाठी चालू आर्थिक वर्षात ४५ कोटी.
- अकोला येथे नवीन पशुवैद्यक पदवी महाविद्यालय स्थापन करण्यास मान्यता. या महाविद्यालयाकरिता शिक्षक संवर्गातील ५६, शिक्षकेतर संवर्गातील ४८ आणि बाह्यस्रोताद्वारे ६० अशी एकूण १६४ पदे नव्याने निर्माण करण्यास मान्यता.
- देशी गो–वंशाचे संवर्धन, संगोपन व संरक्षणासाठी महाराष्ट्र गो–सेवा आयोगाची स्थापना. या आयोगाच्या माध्यमातून गोवर्धन, गोवंश सेवा केंद्र योजना, गोमय मूल्यवर्धन योजना व देशी गोवंशांच्या संवर्धनासाठी भ्रूणब्राह्य फलन व प्रत्यारोपण सुरक्षेत वाढ करताना विदर्भ, मराठवाड्यातील ११ जिल्हे दुग्ध विकासाच्या दुसऱ्या टप्प्यासाठी १६० कोटी रुपयांच्या तरतुदीमुळे या सर्व जिल्ह्यांमध्ये दुग्ध व्यवसाय विकासास चालना मिळणार. राज्यातील ३२४ तालुक्यांमध्ये ही योजना राबविण्यात येणार. प्रत्येक तालुक्यातील एका गोशाळेला या योजनेद्वारे अनुदान देण्यात येणार. ५० ते १०० पशुधन असणाऱ्या गोशाळेस १५ लाख रुपये, १०१ ते २०० पशुधन असणाऱ्या गोशाळेस २० लाख रुपये आणि





२०० पेक्षा जास्त पशुधन असणाऱ्या गोशाळेस २५ लाख रुपये देण्यात येणार.

- पशुवैद्यकीय महाविद्यालयातील आंतरवासिता विद्यार्थ्यांना देण्यात येणारा आंतरवासिता भत्ता ६ हजार रुपयांवरून ११ हजार रुपये.
- राज्यातील विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रासाठी अनुक्रमे अकोला, छत्रपती संभाजीनगर आणि अहमदनगर येथे प्रत्येकी एक यानुसार एकूण ३ फिरत्या भ्रूण प्रत्यारोपण प्रयोगशाळांची स्थापना करणार.

## मत्स्यव्यवसाय

- पाकिस्तानने पकडलेल्या मासेमाऱ्यांच्या कुटुंबीयांना उदरनिर्वाहासाठी मदत करणार.
- पारंपरिक पद्धतीने मासेमारी करणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल मच्छीमार आणि रापणकारांना तयार जाळ्याच्या किमतीच्या ५० टक्के किंवा कमाल मर्यादेच्या ८०० रुपये प्रति कि.ग्रॅ. अनुदानाचा निर्णय.
- राज्यातील बांधकाम प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या मच्छिमारांना नुकसानभरपाई देण्यासाठी धोरण निश्चित.
- राज्यातील मच्छीमार / मत्स्यसंवर्धक आणि मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांची २०२१-२२ या वर्षाची तलाव ठेका रक्कम माफ / समायोजित करण्याचा निर्णय.



## कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता



- पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्यांचे आयोजन. १ जुलै ते ३१ मे २०२३ अखेर २ लाख ४९ हजार २४७ उमेदवारांना रोजगार मिळाला.
- राज्यातील ३६ जिल्ह्यांत सर्व मतदारसंघात ६ मे ते ६ जून २०२३ या कालावधीत छत्रपती शाहू महाराज युवाशक्ती करिअर शिबिरांचे आयोजन.
- महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठासाठी पनवेल येथे अद्ययावत इमारत उभारणार.
- राज्यात 'स्टार्टअप यात्रा' या राज्यव्यापी अभियानात प्रत्येक जिल्ह्यात ३ विजेते असे एकूण १०८ आणि त्यातून राज्यस्तरावरून ७ विविध क्षेत्रातून प्रत्येकी ३ असे २१ विजेते घोषित करण्यात आले.
- राज्यात कौशल्य श्रेणीवर्धन धोरणास मान्यता.
- विभागाने सामाजिक दायित्व निधी व स्वेच्छा देणगी धोरण स्वीकारले.
- गोंडवाना विद्यापीठात इनक्युबेटरची स्थापना.



- राज्यातील युवक-युवतींना रोजगाराची उपलब्धता व्हावी, यासाठी राज्यातील ४४ नामांकित एजन्सिज यांच्यासमवेत सामंजस्य करार करण्यात आले.
- 'रोजगार निर्मिती : सक्षम, कुशल-रोजगारक्षम युवा' यासाठी ११ हजार ६५८ कोटी रुपयांची तरतूद.

## कामगार

- आता असंघटित कामगारांच्या कल्याणासाठी महामंडळ. करोडो कामगारांना लाभ मिळणार
- महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळातर्फे ३१ डिसेंबर २०२२ रोजी वयाची ५५ वर्ष पूर्ण केलेल्या नोंदीत व पात्र घरेलू कामगारांना दहा हजार रूपयांचे सन्मानधन. तसेच

मागील सलग २ वर्ष जीवित नोंदणी असलेल्या पात्र घरेलू कामगारांना महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळाच्या निधीतून सन्मानधन योजना २०२२ अंतर्गत १०,००० रुपये एवढी रक्कम थेट त्यांच्या बँक खात्यात डिबीटीद्वारे जमा करणार.



## कामगार कायद्यांमध्ये सुधारणा

- कामगार कायद्यातील सुधारणांसाठी नियम संहितांना मान्यता.
- सन २०२३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक – २०, ११ एप्रिल २०२३ अन्वये महाराष्ट्र औद्योगिक संबंध अधिनियम, महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम, माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम १९६९, महाराष्ट्र खासगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम १९८१ व महाराष्ट्र कामगारांचा किमान घरभाडे भत्ता अधिनियम १९८३ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम प्रसिद्ध.
- भारतात गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी आणि देशात रोजगार निर्मिती करण्याच्या हेतूने देशात अनुकूल उद्यम वातावरण निर्मितीसाठी उद्योगासंबंधित कायदे व नियम सुलभ व्हावेत, याकरिता व्यवसायाचे सुलभीकरण या उपक्रमाचा एक भाग म्हणून तुरुंगवासाची शिक्षा काढून दंडाची रक्कम वाढविण्यात आली.

## उद्योग



- दावोस येथे महाराष्ट्रात १ लाख ३७ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसाठी सामंजस्य करार.
- नवीन माहिती तंत्रज्ञान साहाय्यभूत सेवा धोरणास मान्यता. ९५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आकर्षित करणार.

- राज्यात ७० हजार कोटींच्या प्रकल्पांना मंत्रिमंडळ उपसमिती बैठकीत मान्यता. ५५ हजार रोजगार निर्माण होणार.
- मुख्यमंत्री रोजगार निर्मितीतून बारा हजारांहून अधिक उद्योजकांना कर्ज मंजूर. एक लाखाहून अधिक युवकांच्या हातांना काम. या वर्षात एकूण १२ हजार ३२६ कर्ज प्रकरणे मंजूर.
- महाराष्ट्र राज्य नावीन्यता सोसायटीमार्फत एटापल्ली येथे जात प्रमाणपत्र ब्लॉकचेन तंत्रज्ञानावर वितरित करणारा प्रकल्प.
- कृषी, ऑटोमोबाईल, उद्योग क्षेत्रातील उद्योजकांना उद्‌भवणाऱ्या समस्या 'संकल्प' प्रकल्पाद्वारे केंद्राकडून सोडविल्या जातील.
- महाराष्ट्र उद्योग, व्यापार आणि गुंतवणूक सुविधा केंद्र (मैत्री) कायद्यामुळे उद्योगासाठी ११९ सेवा सुलभ आणि अधिक वेगवान.
- महाराष्ट्रात नाशिक, जळगाव, सांगली, अकोला, हिंगोली, रत्नागिरी, रायगड, भिवंडी, पुणे येथे ९ लॉजिस्टिक्स पार्क उभारण्यात येतील.



- जालना येथे 'मल्टिमॉडेल लॉजिस्टिक पार्क' उभारण्यासाठी नॅशनल हायवेज लॉजिस्टिक मॅनेजमेंट लिमिटेड आणि जवाहरलाल नेहरू पोर्ट ॲथॉरिटी यांच्यामध्ये सामंजस्य करार.
- जेएसडब्लू कोकणामध्ये सुमारे ४,२०० कोटी रुपयांची गुंतवणूक करणार. पेण येथे ९६० मे.वॅ.चा पीएसपी प्रकल्प होणार.
- उद्योगांना परताव्याचे दावे मंजुरीसाठी औद्योगिक प्रोत्साहन अनुदान कालावधी दोन वर्षांनी वाढविला.

## बंदरे विकास

- येत्या काळात 'प्रधानमंत्री गतिशक्ती नॅशनल मास्टर प्लॅन' कार्यक्रमाच्या माध्यमातून राज्यातील बंदरांचा विकास अधिक वेगाने.




## शालेय शिक्षण

- दारिद्र्यरेषेवरील पालकांच्या मुलांनादेखील मोफत गणवेश देणार. १२ लाख विद्यार्थ्यांना लाभ.
- पुस्तकांमध्येच सरावासाठी कोरी पाने देऊन विद्यार्थ्यांच्या पाठीवरील दप्तराचे ओझे कमी केले.

- नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्याची प्रक्रिया सुरू.
- शासनाच्या तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आठवीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना गणवेश, बूट आणि सॉक्स देण्याचा निर्णय.
- मातृभाषेतून शिक्षणावर भर.
- विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत पाचपट वाढ.



- विद्यार्थ्यांना शेती विषय शिकविण्यात येणार.
- सर्व शाळांमध्ये १० सप्टेंबर हा 'आजी आजोबा' दिवस साजरा करण्यात येणार.
- खासगी अनुदानित शाळांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वाढीव मानधन लागू.
- त्रुटीपूर्तता केलेल्या शाळांना अनुदान मंजूर.
- ६१ हजार शिक्षकांच्या अनुदानाचा प्रश्न सोडविण्यात आला.
- कार्यरत अर्धवेळ ग्रंथपालांचे पूर्णवेळ ग्रंथपालपदी उन्नयन (रूपांतरण) करण्याचा निर्णय.
- विद्यार्थ्यांना कौशल्य शिक्षण देणाऱ्या शाळा तसेच कौशल्य विकास विद्यापीठ सुरू करण्यात येणार.
- मुंबईत 'सेंटर फॉर एक्सलन्स' सुरू करण्यात येणार.
- जर्मनीसह युरोपियन देशांना कुशल मनुष्यबळ पुरविण्यासाठी लवकरच करार करण्यात येणार.
- उत्कृष्ट शाळा म्हणून 'पीएम श्री' योजनेंतर्गत शाळा विकसित करण्यात येणार.
- खासगी अनुदानित शाळांना टप्प्याटप्प्याने अनुदानावर आणण्याची प्रक्रिया सुरू.
- नवीन शाळांच्या मान्यतेसाठी ऑनलाइन प्रक्रिया.
- स्वयंअर्थसाहाय्यित शाळांना मान्यता.




## पर्यटन

- पर्यटन उपविभागासाठी उपसचिव.
- राज्यात 'आई महिला पर्यटन धोरणा'ची होणार अंमलबजावणी.
- गणेशोत्सव आणि स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवांतर्गत ज्येष्ठ नागरिकांसाठी गणेश दर्शन सहलींचे आयोजन.
- पर्यटकांसाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व जैन टूर सर्किट सुरू.



- मुंबई शहरातील ऐतिहासिक इमारतींवर विद्युत रोषणाई.
- शिवनेरी येथे हिंदवी स्वराज्य महोत्सव २०२३, गुरु गोविंद महोत्सव, बिरसा मुंडा आदिवासी महोत्सव, महाबळेश्वर महोत्सव, काजवा महोत्सव इ. विविध पर्यटन महोत्सवांचे आयोजन.
- राज्यात एकूण ८ ठिकाणी टेन्ट सिटी उभारण्यास मान्यता.
- गोसीखुर्द धरणालगत आंतरराष्ट्रीय दर्जाचे जलपर्यटन केंद्र उभारणार.
- केंद्र सरकार पुरस्कृत स्वदेश दर्शन २.० अंतर्गत मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली सुकाणू समितीची स्थापना.
- राज्यात शिवनेरी, गोराई, बुलडाणा, छत्रपती संभाजीनगर, नाशिक व रामटेक येथे शिवसृष्टी उभारणार. या कामांसाठी ४१० कोटी रुपयांची तरतूद.
- महाराष्ट्र पर्यटन गुंतवणूक सुलभीकरण कक्ष स्थापन करण्यासाठी 'सिकॉम'सोबत, पर्यटन वाढीसाठी वाकायामा प्रांत जपान, गोसिखुर्द, जि. भंडारा येथे जलपर्यटन विकास करण्याकरिता सामंजस्य करार.



- गेट वे ऑफ इंडियावर लाईट व साऊंड शो सुरू.
- 'देखो आपला महाराष्ट्र'अंतर्गत १ मे २०२३ रोजी विविध पॅकेज टूर जाहीर.

## अन्न व नागरी पुरवठा




- दिवाळीत शिधापत्रिकाधारकांना 'आनंदाचा शिधा' केवळ १०० रुपयात. राज्यातील ९८ टक्के लोकांना याचा प्रत्यक्ष लाभ.
- गुढीपाडवा तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त देखील शिधापत्रिकाधारकांना १०० रुपयांत 'आनंदाचा शिधा'. आतापर्यंत १ कोटी ५८ लाख जनतेपर्यंत पोहोचला.
- धान व भरड धान्य खरेदीच्या आराखड्यास केंद्राची मान्यता, राज्यास १ कोटी ४९ लाख क्विंटल धान व ६१,०७५ क्विंटल भरड धान्य खरेदीस परवानगी.
- सर्व जिल्ह्यांमध्ये फोर्टीफाईड तांदूळ (पोषणतत्त्व गुणसंवर्धित तांदूळ) दोन टप्प्यांमध्ये वितरित.

## पाणीपुरवठा व स्वच्छता



- 'हर घर जल' या जलजीवन मिशनसाठी सुमारे २२ हजार कोटी रुपयांची तरतूद. मागील एका वर्षात सुमारे साडेआठ घरांना/कुटुंबांना नळ जोडणी.
- मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमात सर्व पाणीपुरवठा योजना कामे पूर्ण.
- मंजुरीप्राप्त ७४३ पाणीपुरवठा योजनांपैकी ७२२ योजनांची कामे पूर्ण.
- १२४.७८ कोटी रुपये इतक्या किमतीच्या ३३ प्रादेशिक पाणीपुरवठा योजना पुनरुज्जीवित करण्यास मंजुरी. ३० योजनांची कामे पूर्ण. ४३० गावे/वाड्या–वस्त्यांमधील ९.३५ लाख नागरिकांना लाभ.

## अल्पसंख्याक विकास

- अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणासाठी सुधारित शिष्यवृत्ती योजना. शिष्यवृत्तीची रक्कम ५० हजार रुपयांपर्यंत वाढविली.
- महिला आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून १५ जिल्ह्यांमध्ये अल्पसंख्याक महिलांचे नवीन २ हजार ८०० बचतगट.



## महसूल

- मुंबई मेट्रो–३ मार्गासाठी धारावीचा भूखंड.
- भूखंडाच्या हस्तांतरणातील अनर्जित रकमेसाठी सुधारित धोरण.
- राज्यातील नागरिकांना स्वस्त दराने रेती/वाळू मिळण्यासाठी तसेच अनधिकृत रेती/वाळू उत्खननाला आळा घालण्यासाठी महसूल विभागाने नवे सर्वंकष सुधारित वाळू/रेती धोरण. या नवीन धोरणानुसार प्रायोगिक तत्त्वावर एक वर्षासाठी सर्व नागरिकांना प्रति ब्रास ६०० रुपये (रुपये १३३ प्रति मेट्रिक टन) वाळू विक्रीचा दर निश्चित.



- वहिवाटीच्या वादावर 'सलोखा योजना' ३ जानेवारी २०२३ पासून सुरू. एका शेतकऱ्याच्या नावावरील शेतजमिनीचा ताबा दुसऱ्या शेतकऱ्याकडे व दुसऱ्या शेतकऱ्याच्या नावावरील शेतजमिनीचा ताबा पहिल्या शेतकऱ्याकडे असणाऱ्या शेतजमीनधारकांचे अदलाबदल दस्तांसाठी मुद्रांक शुल्क नाममात्र १ हजार रुपये आणि नोंदणी फी नाममात्र १ हजार रुपये.

- सलोखा योजनेंतर्गत राज्यात एकूण १४९ दस्त संख्येची नोंद. सवलतीनुसार मुद्रांक शुल्क आणि नोंदणी शुल्क असे अनुक्रमे १ लाख ४९ हजार २०० रुपये एवढे प्राप्त. राज्यभरात सर्वात जास्त ७६ एवढी दस्त संख्येची नोंदणी अमरावती विभागात झाली असून यात यवतमाळ जिल्हा आघाडीवर आहे.
- महाराजस्व अभियानात सर्व शेतकऱ्यांना घरी जाऊन शेतीचा सातबारा देणे आणि फेरफार निकाली काढण्यासाठी निश्चित कालमर्यादा आणि फेरफार अदालतीचे आयोजन करणे, भूसंपादनाची गावपातळीवरील कमी–जास्त पत्रके अद्ययावत करणे आदींसह प्रमुख आठ बाबींचा समावेश.



- ई–पीक पाहणी ॲपमुळे राज्यातील शेतकऱ्यांना स्वत:च आपल्या पिकाची नोंद ठेवता येणार. या प्रणालीमध्ये आतापर्यंत १ कोटी ५५ लाखांहून अधिक खातेदारांची नोंदणी.
- यापूर्वी सेवा कालावधीनुसार कोतवालांना ७,५०० रुपये मानधन मिळत होते. आता मानधन दुप्पट करण्यात आले असून कोतवालांना प्रति महिना १५ हजार रुपये मानधन. १ एप्रिल २०२३ पासून याची अंमलबजावणी. याचा १२ हजार ७९३ कोतवालांना फायदा.
- ‘राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा’ अभियान कालावधीत महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत अधिसूचित केलेल्या एकूण १४ सेवांकरिता प्राप्त अर्जांपैकी ६६ हजार ८१ हजार ७०१ अर्ज निकाली.
- भारत संचार निगम लिमिटेड यांची ४जी सेवा दूरक्षेत्रामधील गावांमध्ये उपलब्ध करून देण्यासाठी भारत संचार निगम लि. यांना २०० चौ.मी.पर्यंतची जागा कोणतीही रक्कम न आकारता, मागणी प्राप्त झाल्यानंतर १५ दिवसांत देण्याचा निर्णय.



- भारत संचार निगम लिमिटेड यांना अतिरिक्त २,७५१ गावांमध्ये जागा उपलब्ध करून देण्याबाबत ५ एप्रिल २०२३ रोजी शासन निर्णय निर्गमित.

- खरेदी-विक्री व्यवहारामध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. दुय्यम निबंधक कार्यालयातही नागरिकांची वाढती गर्दी पाहता नागरिकांसाठी सुट्टीच्या दिवशी दस्त नोंदणी कार्यालय सुरू. जिल्हा मुख्यालय आणि महानगरपालिका क्षेत्रातील दुय्यम निबंधक कार्यालये शनिवार आणि रविवार या सुट्टीच्या दिवशी सुरू.



- एखाद्या जमिनीवर बांधकाम परवानगी अथवा रेखांकन मंजुरी देण्यात आली असताना अशा जमिनीमध्ये प्रस्तावित अकृषिक प्रयोजनाचा वापर अनुज्ञेय असल्याची खात्री करण्यात येते. अशी खात्री केल्यानंतर अशा जमिनींकरिता स्वतंत्रपणे अकृषिक परवानगीची गरज नाही.
- भारतीय लष्कर, नौदल व वायुदल या तीनही भारतीय सैन्य दलाच्या पुणे येथील लोहगावस्थित सिव्हिल डिफेन्स गृहरचना संस्थेचा प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यात आला.

## महिला व बालविकास

- केंद्र पुरस्कृत उज्ज्वला व स्वाधार योजना विलीन करून केंद्र पुरस्कृत ५० शक्तिसदन राज्यात बांधणार.



- संस्थात्मक आणि संस्थाबाह्य या दोन्ही प्रवर्गातील अनाथांना शिक्षण व नोकरीमध्ये ३१ ऑक्टोबर, २०२२ नंतर होणाऱ्या नवीन परीक्षांना १ टक्का आरक्षण लागू.
- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार सन २०१५-१६, २०१६-१७, २०१७-१८, २०१८-१९ व २०१९-२० या वर्षाचे राज्यस्तरीय, विभागस्तरीय व जिल्हास्तरीय पुरस्कारांचे वितरण.
- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त ग्रामपंचायतस्तरावर प्रथमच २७ हजार ९९७ ग्रामपंचायतींमधील ५५,७९४ महिलांचा सत्कार.

- आंतरधर्मीय विवाह–परिवार समन्वय समिती (राज्यस्तरीय) गठित.
- राज्यातील संकटग्रस्त महिलांसाठी १८१ क्रमांकाची महिला हेल्पलाईन सुरू.
- खुल्या प्रवर्गातील पदावरील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीकरिता खुल्या प्रवर्गातील महिला; तसेच सर्व मागास प्रवर्गातील महिलांनी नॉन–क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अट रद्द.



- नोकरी करणाऱ्या महिलांसाठी ५० सखी निवास.
- राज्यात सर्व जिल्ह्यांमध्ये एकूण ४२ वन स्टॉप सेंटर्स सुरू करण्यात येणार.
- बालसंगोपन योजनेंतर्गत प्रति बालक देण्यात येणाऱ्या परिपोषण अनुदानात १,१००/– रुपयांवरून २,२५०/– रुपये इतकी तसेच या योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांना सहायक अनुदानात प्रति बालक दरमहा १२५/– रुपयांवरून २५०/– रुपये इतकी वाढ.
- बालसंगोपन योजनेच्या सुधारित मार्गदर्शक सूचना निर्गमित 'क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजना' असे असणार आता या योजनेचे नाव.
- अंगणवाडी दत्तक धोरणअंतर्गत सामाजिक संस्थांनी ४,४४७ अंगणवाड्या घेतल्या दत्तक.



- अंगणवाडी सेविकांचे मानधन दरमहा ८,३२५ रुपयांवरून १०,००० रुपये, मिनी अंगणवाडी सेविकांचे मानधन दरमहा ५,९७५ रुपयांवरून ७,२०० रुपये व अंगणवाडी मदतनीस यांच्या मानधनात दरमहा ४,४२५ रुपयांवरून ५,५०० रुपयांपर्यंत वाढ.

## आदिवासी विकास

- २५० शासकीय आदिवासी आश्रमशाळांना आदर्श आश्रमशाळा करणार.
- अनुसूचित जमातीच्या १०० विद्यार्थ्यांना पीएच.डी.साठी अधिछात्रवृत्ती.
- ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा योजनेच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये सुधारणा.
- नोव्हेंबर २०२२ अखेरपर्यंत १ लाख ९८ हजार वैयक्तिक तर ८५०० इतके सामूहिक वनहक्क दावे मान्य.



## क्रीडा

- खेळाडूंची कामगिरी उंचावण्यासाठी मिशन लक्ष्यवेध.
- बालेवाडी पुणे येथे स्पोर्टस् सायन्स सेंटर उभारणार. छत्रपती संभाजीनगर येथे नवीन क्रीडा विद्यापीठास ५० कोटी रुपये.
- नागपूर विभागीय क्रीडा संकुलासाठी १०० कोटी रुपये.
- जपानमधील वाकायामा राज्याच्या कुस्तीगीर संघटनेबरोबर सामंजस्य करार.



## पर्यावरण



- स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त ७५ तलाव संवर्धनाचा कार्यक्रम.
- प्लास्टिकबंदी धोरणाच्या अधिसूचनेमध्ये सुधारणा करण्याचा निर्णय.
- राष्ट्रीय जल मॉनिटरिंग प्रोग्राम (एनडब्ल्यूएमपी) अंतर्गत महाराष्ट्रातील ५६ नद्यांच्या १५६ ठिकाणांचे जैवविविधता देखरेख व सारणी करण्याचे काम पूर्ण.
- सांडपाणी व्यवस्थापनाच्या सुविधांच्या स्थापनेसाठी नगरपरिषदा, नगरपंचायती आणि ग्रामपंचायतींना आर्थिक व तांत्रिक साहाय्य.
- महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सर्व प्रयोगशाळा अत्याधुनिक उपकरणांसह अद्ययावत.
- औद्योगिक क्लस्टर्सचा व्यापक पर्यावरणीय प्रदूषण निर्देशांक अंतर्गत अल्पकालीन आणि दीर्घकालीन कृतिआराखडा तयार.
- कार्बन फूटप्रिंट मोजण्यासाठी मोबाइल ॲप्लिकेशन तयार.
- महाराष्ट्र राज्य स्वच्छ हवा कृती योजना विकसित.
- माझी वसुंधरा ३.० पुरस्कारांचे वितरण. पर्यावरण संवर्धनासाठी काम करणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांचा गौरव.

## खनिकर्म



- राज्यात खनिज क्षेत्रामध्ये पायाभूत सुविधा विकासासाठी खनिज विकास धोरण-२०२३ तयार करण्याचा निर्णय.
- राज्यातील प्रमुख खाणपट्टे ई-लिलावासाठी उपलब्ध करून देण्याचा निर्णय. त्यामुळे राज्याच्या महसुलात भर पडणार.

## मराठी भाषा




- मराठी भाषा धोरण लवकरच जाहीर करण्यात येणार.
- मुंबईत मराठी भाषा भवन उभारण्यात येणार. मराठी भाषा विभागाच्या आधिपत्याखालील सर्व कार्यालये एकाच इमारतीत आणण्याचा मानस.
- दरवर्षी जानेवारी महिन्यात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात येणार.
- मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळविण्यासाठी प्रयत्नशील.
- मराठी भाषकांच्या 'मराठी तितुका मेळवावा' (विश्वसंमेलन) चे मुंबईत जानेवारीमध्ये आयोजन.
- पुस्तकाचे गाव विस्तार योजना व्यापक करणार.
- अन्य राज्यात असलेल्या मराठी भाषकांसाठी बृहन्महाराष्ट्र मंडळामार्फत साहित्य संमेलन आयोजित करण्यासाठी २५ लाख रुपये इतका निधी मंजूर करण्यास मान्यता.
- वारकरी साहित्य परिषदेमार्फत एक वेळची विशेष बाब म्हणून अखिल भारतीय मराठी संत साहित्य संमेलनाच्या आयोजनासाठी २५ लाख रुपये इतके अर्थसाहाय्य मंजूर.
- मराठी भाषा युवक मंडळे स्थापन करण्यास व त्यांना अनुदान देण्यास मान्यता देण्याचे विचाराधीन.
- अन्य साहित्य संमेलनांना शासनामार्फत दिले जाणारे अनुदान यापुढे वाढवून देण्याचे विचाराधीन.
- महाराष्ट्र कर्नाटक सीमावर्ती भागात मराठी भाषा संस्कृती व विकासासाठी कार्य करणाऱ्या मान्यताप्राप्त संस्थांना अनुदान मंजूर करण्याचा निर्णय.

# शासन आपल्या दारी !




शासनाच्या विविध कल्याणकारी योजना आणि सेवांचा लाभ सर्वसामान्य जनतेला देण्यासाठी राज्यात सध्या 'शासन आपल्या दारी' अभियान सुरू आहे. १४ मे २०२३ रोजी सातारा जिल्ह्यातील पाटण येथे शुभारंभ झालेल्या या अभियानामुळे आजपर्यंत राज्यातील सुमारे ३५ लाख लाभार्थ्यांना विविध लाभ मिळाले आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेले 'शासन आपल्या दारी' अभियान आता गतिमान शासनाचा महत्त्वाचा भाग बनले आहे. पाटणनंतर रत्नागिरी, कन्नड, कुडाळ, कोल्हापूर, पालघर, नांदेड, जळगाव येथे आयोजित कार्यक्रमांना जनतेचा लाभलेला उत्स्फूर्त प्रतिसाद आणि गरजू, सर्वसामान्य लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावरचे समाधान अभियानाच्या यशस्वितेची प्रचिती देते.








मा.श्री.डॉ. अमोल कोल्हे
लोकसभा सदस्य


Mahindra






KARTAR










जून २०२३

mahasamvad.in | /MahaDGIPR | /MaharashtraDGIPR

प्रकाशक : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन आणि मुख्यमंत्री जनसंपर्क कक्ष